## छंद पुष्परचनेचा - २२

‘S’ आकाराच्या किंवा होगार्थ रचना

पाश्चात्य रचनांमधील इंग्रजी S आकाराच्या (होगार्थ रचना) हा प्रकार यावेळी बघणार आहोत.

इंग्रजी ‘S’ आकारामधे रचना लावली जाते. यासाठी थोडा मध्यम उंचीचा किंवा उंच फ्लॉवर व्हाज वापरावा. S हा आकार साधण्यासाठी उजवीकडे व डावीकडे गोलाकार वळण असलेल्या फुलांच्या अथवा झाडाच्या नाजूक फांद्या निवडणे आवश्यक आहे. उंच व्हाजचे तोंड बहुतेक वेळा लहान असते. त्यामध्ये फ्लोलर स्पंज बसवून या रचना कराव्यात. S आकाराच्या मधल्या भागात फुले व बाकी दोन्ही एसच्या टोकाकडे जाणाऱ्या वळणदार फांद्या मिळून ही रचना होते.



सोबत दिलेल्या या रचनेमध्ये मध्यम उंचीचा पांढरा व्हाज व त्यात लीलीची दोन फूले वापरली आहेत. फुलाच्या वरच्या व खालच्या बाजूला छोट्या फांद्या लावून S आकार साधला आहे.

.



शेजारील रचनेमध्ये वेलाच्या फांद्यांमधून S आकार साधला आहे व त्यामध्ये छोटी फुले लावली आहेत. जाड तारेचा उंच कँडल स्टँड यासाठी वापरला आहे.

सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, पुणे चॅप्टर
asdssd@gmail.com